पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, ऑक्टोबर २०२०, खंड १९, अंक ७, पृष्ठे ३२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● दोलायमान

५ ● आजची जागतिक व्यवस्था

१९ ● चिनी कुरापती की युद्धाची खुमखुमी?

- पार्श्वभूमी
- सद्यःस्थिती


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १९ (अंक ७) ऑक्टोबर २०२०**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**

*अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# दोलायमान

नेहेमीपेक्षा 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकाचे स्वरूप निराळे आहे. 'अर्थबोधपत्रिके'च्या संपादकीय विभागामध्येच तयार केला जाणारा संस्कारित मजकूर अंकामध्ये वापरण्याच्या दंडकाला या वेळी अंमळ मुरड घातलेली दिसेल. या अंकात लेख आहेत दोनच. या दोन्ही लेखांचे निर्मिक आहेत त्या त्या क्षेत्रातील मान्यवर अभ्यासक. दोन लेखांत पुन्हा आणखी एक वेगळेपण आहेच. दोहोंतील एक लेख भागीदारीच्या तत्वावर साकारलेला आहे. 'अर्थबोधपत्रिके'चा संपादकीय विभाग आणि एक सन्मान्य निमंत्रित तज्ज्ञ यांच्या संयुक्त योगदानाद्वारे एका लेखाची जडणघडण साधलेली आहे. असा प्रयोग या वेळी प्रथमच करण्याचा प्रयत्न केलेला आहे. निर्मितीप्रक्रिया अशी भिन्न भिन्न असली तरी, दोन्ही लेखांमधील आंतरिक सूत्रामध्ये साम्य आहे. देश-विदेशात आढळून येणा-या दोलायमान परिस्थितीचे कवडसे अलवारपणे प्रगट करणे, हे ते साम्य. मुळात, सध्या सगळ्या जगाची घडी पूर्णपणे विस्कटून टाकणा-या 'कोविड-१९' या विषाणूने हाहाकार उडविलेला आहे. त्यांतच, अमेरिकी अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी ज्या प्रकारे सत्ता २०१६ सालानंतर राबविली त्यांमुळे जागतिक स्तरावरील बहुराष्ट्रीय आर्थिक आणि त्यांतल्यात्यांत पुन्हा व्यापारी संबंधांची वीणही विस्कळीत झालेली आपण सगळेच अनुभवतो आहोत. २० व्या शतकातील अखेरच्या दशकापासून आखातामधील अमेरिकी हस्तक्षेप उत्पातक पडसाद उमटवू लागला होताच. त्यांतच भर पडली ती ट्रम्प महाशयांच्या इराणवर आर्थिक निर्बंध नव्याने जारी करण्याच्या पावलांची. आखाती देशातील अशांततेलाही तेथील पंथीय संघर्षांची एक किनारही चिकटलेली आहेच. या ना त्या स्वरूपातील राष्ट्रवादाचा परिपोष करणा-या शक्ती व प्रवृत्ती एकंदरीनेच जगाच्या विविध भागांत आज सक्रिय बनत आहेत, बनू पाहत आहेत. या सगळ्याला गतिविधींमध्येच तिकडे आशियामध्ये चीन त्याचा विस्तारवाद आक्रमकपणे जोपासताना आताशा जारीने कार्यरत बनलेला दिसतो. आशिया खंडाचे निरंकुश आणि निर्विवाद नेतृत्व आपल्या हाती राखण्याची चिनी महत्वाकांक्षा आता प्रकर्षाने अधोरेखित होते आहे.



आजचे वास्तव असे आहे की, त्या त्या देशाची आर्थिक बुलंदी हे त्या त्या देशाच्या जागतिक स्तरावरील प्रतिमेचे आणि प्रभावाचे एक प्रमुख गमक गणले जाते. चीनच्या नेमक्या त्याच भांडवलाला अलीकडील काळात कसर लागलेली आहे. वस्तुनिर्माण उद्योगाचे वैश्विक केंद्र म्हणून प्रस्थापित होऊन क्रमाने जागतिक स्तरावरील एक सर्वोच्च बलाढ्य अशी आर्थिक, सामरिक तसेच तंत्रशास्त्रीय शक्ती म्हणून उदयाला येण्याची चिनी महत्वाकांक्षा आता लपून राहिलेली नाही. त्या सामर्थ्याची उभारणी आर्थिक ताकदीच्या बळावर करण्याच्या दिशेने १९७७-७८ सालापासून चीनने अतिशय पद्धतशीरपणे प्रयत्न चालू केले. परंतु, २००८ साली अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये फुटलेल्या 'सबप्राइम' कर्जांच्या फुग्याने चिनी स्वप्नालाही कठोर दणका दिला. भरधाव विकासाचा चिनी वारू तेव्हापासून दुडकी चाल चालत आहे. ***(कृपया पृष्ठ क्रमांक १४ पाहावे)***

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

राजकारण

# आजची जागतिक व्यवस्था

● डॉ. श्रीकांत परांजपे

जागतिक व्यवस्थेबाबत आज चर्चा करताना साहजिकच 'कोविड'च्या समस्येवर लक्ष केंद्रित केले जाते. ही चर्चा मुख्यतः या साथीमुळे निर्माण होणा-या आर्थिक परिणामांवर भर देते, कारण या साथीमुळे संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था संकटात आलेली आहे. तरीही समकालीन जागतिक व्यवस्थेचा आढावा घेत असताना त्याचा झोत केवळ 'कोविड' आणि अर्थकारण इतका मर्यादित ठेवून चालणार नाही. आज जागतिक व्यवस्थेसमोर असणारी अनेक आव्हाने प्रामुख्याने राजकीय तसेच लष्करी स्वरू पाची आहेत. त्यांचा अर्थकारणाशी घनिष्ट संबंध आहे. चीनमधील बदलती परिस्थिती, रशियाचे धोरण, अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकांचे आव्हान, ब्रिटनचे 'ब्रेक्झिट' प्रकरण, पश्चिम आशियातील इराण आणि सौदी अरेबियातील वाद, तुर्कस्तानची बदलती भूमिका, इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील बदलती समीकरणे इत्यादींचा त्यांत समावेश होतो. या सर्व घटनांचे भू-राजकीय तसेच आर्थिक संबंध आहेत. त्याचप्रमाणे जागतिक व्यवस्थेत स्थैर्य आणण्यासाठी निर्माण केलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनांची वाढती दुर्बलतादेखील लक्षात घेण्याची गरज आहे. आजचे जागतिक वास्तव रेखाटत असताना, या ठिकाणी, प्रथम देशनिहाय विश्लेषण मांडलेले आहे. त्या विवेचनाच्या प्रकाशात दृग्गोचर होणारे वैश्विक व्यवस्थेचे चित्र लेखाच्या अंतिम चरणात रेखाटलेले आहे.

**चीन :** आजच्या चीनच्या आक्रमक भूमिकेचे वर्णन करताना 'आक्रमक राष्ट्रवाद' किंवा 'वाढता लष्करी राष्ट्रवाद' असा उल्लेख केला जातो. दक्षिण चिनी समुद्राबाबतची चीनची भूमिका, त्या क्षेत्राचा पूर्ण ताबा मिळवण्याचा चीनचा चालू असलेला प्रयत्न, हाँगकाँगबाबत चीनने केलेला नवीन सुरक्षा कायदा, त्या प्रदेशाचे मर्यादित स्वरू पाचे स्वावलंबन त्यांद्वारे



संपुष्टात आणण्याचा चीनचा पवित्रा, तैवानबाबतची चीनची आक्रमक भूमिका, भारताच्या सीमेवर सुरू असलेले घुसखोरीचे प्रयत्न इत्यादींचा समावेश यांत करता येईल. चीनच्या या आक्रमकतेचा राजकीय भाग हा त्यांच्या नव्या स्वरूपाच्या 'राजनया'त (Diplomacy) दिसून येतो ('नय' म्हणजे मार्ग). या राजनयाचे वर्णन आता 'लांडगा योद्धा' (Wolf Warriors) असे केले जाते.

चीनच्या या आक्रमक राजकारणाचा शोध घ्यायचा झाला तर त्याची पाळेमुळे बदलत्या आर्थिक घटकांमध्ये दिसून येतात. अमेरिका आणि चीन यांच्यादरम्यानच्या व्यापारी युद्धाने त्याची सुरु वात झाल्याचे दिसून येईल. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यानंतर त्यांनी 'अमेरिका प्रथम' या धोरणांतर्गत अमेरिकी अर्थव्यवस्थेत बदल करण्याचा प्रयत्न केला. बिल क्लिंटन तसेच बराक ओबामा यांच्या काळात अमेरिकेने खासगी कंपन्यांना चीनमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिले होते. त्याचा दूरगामी परिणाम अमेरिकेतील उद्योगांवर, तेथील उपलब्ध रोजगाराच्या संधींवर झाला. अमेरिकी उद्योग पुन्हा अमेरिकेत आणून रोजगार वाढवण्याच्या हेतूने ट्रम्प यांनी चीनवर व्यापारी निर्बंध घालण्यास सुरु वात केली. चीनच्या विरोधात भूमिका घेण्याचे धाडस करणारे ते पहिले राष्ट्राध्यक्ष ठरले. अमेरिकेच्या या नव्या भूमिकेचा चीनच्या अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होऊ लागला. त्यात वूहानमधून सुरू झालेल्या 'कोविड'च्या साथीने भर घातली आणि चीनच्या अर्थव्यवस्थेला धोका निर्माण झाला. चीनच्या एकाधिकारी राजकीय व्यवस्थेला हे मोठे आव्हान होते. चीनच्या अर्थव्यवस्थेला धोका निर्माण झाला तर सर्वसामान्य चिनी माणसाच्या रोजच्या जीवनाला धोका निर्माण होतो. जोपर्यंत चिनी राजकीय तसेच आर्थिक व्यवस्था सर्वसामान्य माणसाला त्याच्या दैनंदिन जीवनात स्थैर्य देईल, त्याच्या पुढ्यात कोणतीही मूलभूत आव्हाने निर्माण करणार नाही तोपर्यंत या व्यवस्थेला सर्वसामान्य चिनी नागरिक आव्हान देणार नाही. परंतु, राजकीय पातळीवरील अक्षमतेमुळे जर जीवनशैलीला धोका निर्माण झाला तर चिनी नागरिक त्या राजकीय व्यवस्थेविरोधात आवाज उठवू शकतो. तो आवाज दाबण्यासाठी बळाचा वापर केला जातो. चिनी सरकारने

कम्युनिस्ट पक्षाच्या चौकटीत ते करण्याचा प्रयत्न केला. त्याच बरोबरीने सरकारला जनतेचा पाठिंबा मिळावा म्हणून चीनला बाह्य घटकांपासून कसा धोका निर्माण झाला आहे, ही भूमिका मांडण्यास सुरु वात केली गेली. अमेरिकेकडून आर्थिक धोका, जपानकडून समुद्री क्षेत्रात आव्हान, दक्षिण चिनी समुद्रावर बाहेरील राष्ट्रांचा कब्जा, भारताकडून प्रदेश बळकावण्याचा धोका या सारख्या कथनांचा यात समावेश होतो. तसेच, इस्लाम पंथीयांकडून दहशतवादाचा धोका तर तिबेटी समाजाकडून सांस्कृतिक आव्हाने हे अंतर्गत धोके सांगितले जात आहेत. त्या सर्व धोक्यांना सामोरे जाण्यासाठी चिनी जनतेने एकजुटीने पुढे येण्याची गरज आहे. या प्रचारात्मक भूमिकेतूनच लष्करी राष्ट्रवादाचा जन्म झाला आणि त्याचा पद्धतशीरपणे वापर केला जाऊ लागला.

याच संदर्भात, एक जुना दाखला लक्षात घेण्याची गरज आहे. १९८९ मध्ये चीनमध्ये Tiananmen Square या ठिकाणी विद्यार्थ्यांनी मोठे आंदोलन केले होते. चीनची एकाधिकारशाही व्यवस्था संपवून लोकशाही व्यवस्था आणावी यासाठी ते आंदोलन होते. बीजिंगच्या Tiananmen Square या ठिकाणी अनेक दिवस ते आंदोलन चालले आणि मग चिनी सरकारने ते मोडून काढण्यासाठी सैन्याचा वापर केला. त्या विद्यार्थ्यांवर बिनदिक्कत गोळीबार करण्यात आला. आंदोलनकर्ते अनेक विद्यार्थी त्यांत प्राणाला मुकले. चीनच्या या कारवाईचा जगभरातून निषेध झाला. परंतु, प्रत्यक्ष चीनमध्ये सर्वसामान्य जनतेने या आंदोलनाला पाठिंबा दिलेला दिसला नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणात जे आंदोलन झाले, की जे केवळ बीजिंगमध्ये नव्हे तर इतर शहरांतदेखील झाले! त्याचे पडसाद चीनच्या अर्थव्यवस्थेवर पडले नाहीत. पुढे त्याचे विश्लेषण करताना असे लक्षात आले की, सर्वसामान्य चिनी जनतेला चिनी व्यवस्थेत बदल नको होता. त्या आंदोलनातून निर्माण होणा-या नव्या व्यवस्थेबाबतची अनिश्चितताही त्या जनतेला नको होती. त्यामुळेच चीनमध्ये अस्तित्वात असलेल्या आणि घट्ट रु जलेल्या राजकीय व्यवस्थेबाबतचा नागरिकांचा विश्वास ढळला नाही आणि म्हणूनच कदाचित विद्यार्थ्यांच्या त्या आंदोलनामागची वैचारिक भूमिका योग्य असतानादेखील त्यांना पाठिंबा मिळाला नाही.



आज चीनचे अर्थकारण दोलायमान झालेले दिसून येते. आजची राजकीय व्यवस्था जर ह्या परिस्थितीला प्रगल्भपणे हाताळू शकली नाही तर त्या व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास उडू शकतो, ही चिनी राज्यकर्त्यांना भीती आहे. या सगळ्या गुंतागुंतीला चिनी सत्ताधीश कसे सामोरे जातात, हा म्हणूनच येत्या काळातील संवेदनशील आणि औत्सुक्याचा मुद्दा राहील.

**अमेरिका :** अमेरिकेत ट्रम्प सत्तेवर आल्यापासून त्यांच्या राष्ट्राच्या धोरणात बरेच बदल घडून आले आहेत. चीन विरोधातील अमेरिकेची भूमिका हे ट्रम्प यांचे यश मानले जाते. २०१६ साली निवडणूक लढवत असताना जी आश्वासने दिली ती आता पूर्ण केली जात आहेत, असे ट्रम्प सांगत आहेत. अमेरिकेत नव्या राष्ट्राध्यक्षांची निवड करण्यासाठी ३ नोव्हेंबर २०२० रोजी मतदान होणार आहे. ट्रम्प यांच्या विरोधात 'डेमोक्रॅटिक' पक्षाचे Joe Biden हे प्रतिस्पर्धी म्हणून उभे आहेत. 'कोविड'च्या समस्येला कशा पद्धतीने सामोरे जायचे हा जरी आजच्या घडीला दोघांमधील वादाचा प्रमुख प्रश्न भासत असला तरी खरा रोख हा इतर समस्यांवर राहण्याची दाट शक्यता आहे. पूर्वी एका निवडणुकीदरम्यान बिल क्लिंटन यांनी उद्गारलेले वाक्य खूप गाजले होते. 'अरे मूर्खा अर्थव्यवस्थेकडे पाहा.' (Its the economy, stupid) हे ते वाक्य! ट्रम्प यांच्या काळात अर्थव्यवस्थेमध्ये सुधारणा झाली ही वस्तुस्थिती आहे आणि हा मुद्दा ते आग्रहाने मांडत आले आहेत. मात्र, त्याच्या जोडीला इतर अनेक महत्त्वाचे मुद्दे आहेत. आफ्रिकी-अमेरिकी लोकांमधील असुरक्षिततेची भावना, हा मुद्दा आज तीव्रतेने पुढे येतो आहे. अमेरिकी पोलिसांनी एका आफ्रिकी-अमेरिकी व्यक्तीला अमानूष मारहाण केली. दुर्दैवाने त्यात त्या व्यक्तीचा मृत्यू झाला. ही अत्यंत निंदनीय अशी गोष्ट होती. त्या विरु द्ध अनेक शहरांमध्ये उद्रेक झाला, अनेक ठिकाणी दंगली झाल्या, त्याला 'डेमोक्रॅटिक' पक्षाचा अप्रत्यक्ष पाठिंबा होता. त्यामुळे हा विषय सध्या ऐरणीवर आलेला आहे. एकीकडे ट्रम्प हे कायदा व सुव्यवस्थेवर आपला भर असल्याचे आग्रहाने प्रतिपादन करीत आहेत. तर, Joe Biden यांचा पक्ष त्याबाबत मोघम भूमिका घेताना दिसतो आहे. सत्तेवर आल्यापासून अमेरिकेतील उदारमतवादी माध्यमांनी ट्रम्प यांच्या विरोधात मोहिम सुरू केली होती.

ट्रम्प सत्तेवर येणे हे तसे अनपेक्षित होते. 'प्रथम अमेरिका' (America first) या भूमिकेतून ते प्रखर राष्ट्रवादाचा आग्रह धरीत होते. ट्रम्प यांनी उचललेली पावले जागतिक उदारमतवादाच्या विरोधात होती. किंबहुना, ट्रम्प यांनी उचललेली सर्वच पावले उदारमतवादाच्या विरोधात होती. अमेरिकेत येणा-या स्थलांतरितांवर आणि निर्वासितांवर त्यांनी अंकुश आणला. युरोपीय सुरक्षाव्यवस्थेतून ट्रम्प यांनी बाहेर पडायचे ठरवले. पश्चिम युरोपीय सुरक्षिततेसाठी युरोपीय राष्ट्र फारसे आर्थिक योगदान करण्यास तयार नव्हती हे ट्रम्प यांनी दिलेले त्या मागील कारण. कॅनडा, अमेरिका आणि मेक्सिको यांच्या दरम्यानचा व्यापारी करार अमेरिकेच्या हिताचा नसल्याने धोरणीपणाने त्यांनी तो बदलून टाकला. ट्रम्प यांच्या राष्ट्रवादी धोरणांचा आग्रह धरणा-या पावलांकडे पाहता आणि त्यांनी अमेरिकेत जे आर्थिक स्थैर्य निर्माण केले गेले आहे ते लक्षात घेता, पुन्हा ट्रम्पच निवडून आले तरी त्याचे आश्चर्य वाटणार नाही.

**पश्चिम आशिया :** पश्चिम आशियाई राजकारणात पाश्चिमात्य राष्ट्रे गेली अनेक दशके हस्तक्षेप करीत आली आहेत. तेलाचे राजकारण हा त्यातील एक महत्त्वाचा घटक. त्यामुळे आखाती देशांचे महत्त्व खूपच वाढलेले होते. एके काळी ब्रिटन आणि फ्रान्स, नंतर अमेरिका आणि काही मर्यादित प्रमाणात सोव्हिएत रशिया ही राष्ट्रे त्या क्षेत्रात हस्तक्षेप करीत होती. या प्रदेशात आता चीनने शिरकाव केलेला दिसून येतो. अर्थात, हा हस्तक्षेप करताना वेगवेगळी कारणे दिली जात होती. लोकशाही व्यवस्थेची जपणूक, मानवी हक्कांचे संवर्धन, आधुनिकीकरण या सारखी ख-या अर्थाने 'जागतिक स्वरूपाची' मानवी मूल्ये रुजविण्यासाठी हा हस्तक्षेप योग्यच आहे, असे दर्शविले जात होते. कदाचित ही राष्ट्रे आपले हे सर्व हेतू अत्यंत प्रामाणिकपणे मांडत असावेत असे गृहित धरले तरीही, त्या भूमिकेकडे एका वेगळ्या बाजूने बघण्याची गरज आहे. अफगाणिस्तानविरोधात १८३९ साली ब्रिटनचे पहिले युद्ध झाले. त्यात ब्रिटनचा दारुण पराभव झाला. या युद्धापूर्वी Sir Claud Ved यांनी ब्रिटनला सावध करणारा अतिशय महत्त्वाचा उपदेश केला होता. त्यांच्या मते, ब्रिटनला (किंबहुना, एकूणच पाश्चिमात्य राष्ट्रांना) आपल्या संस्कृतीचा, विचारांचा, (लोकशाही) मूल्यांचा इतका



फाजील आत्मविश्वास असतो की, त्यांच्या मते 'मागास' असलेल्या राष्ट्रांत ही मूल्ये रुजविण्याचा ते आटोकाट प्रयत्न करतात. अशा प्रयत्नांना केवळ आक्रमक विरोधच होऊ शकतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे, ज्या देशांमध्ये असा प्रयत्न केला जातो तेथील इतिहास, संस्कृती, परंपरा समजूनच घेतली जात नाहीत. त्यामुळे खरा संघर्ष उद्‌भवतो. Sir Claud Ved यांनी १८३९ मध्ये दिलेला इशारा आजदेखील तितकाच महत्त्वाचा आहे. कारण अफगाणिस्तान, इराण किंवा इराकमध्ये अमेरिकेने हीच चूक पुन्हा केल्याचे दिसते. म्हणूनच अफगाणिस्तानमध्ये एकेकाळी ब्रिटनला, नंतर सोव्हिएत रशियाला आणि नंतर अगदी अलीकडे अमेरिकेलाही अपयश आले. १८३९ साली अफगाणिस्तान युद्धात तेव्हाचा सत्ताधीश असलेल्या मेहरबखान यांनी ब्रिटनला विचारले होते, की 'तुम्ही इथे सैन्य तर आणले आहे. परंतु, ते पुन्हा माघारी नेण्याची योजना केली आहे का?' हाच प्रश्न रशिया किंवा अमेरिकेलादेखील आजही लागू होताना दिसतो.

अमेरिका, रशिया आणि चीन या राष्ट्रांच्या पलीकडे पश्चिम आशियातील आजचा खरा संघर्ष आहे तो सौदी अरेबिया आणि इराण यांच्यामध्ये. या संघर्षाचा एक पैलू शिया आणि सुन्नी या दोन पंथियांमधील वाद हा असेलही; परंतु, खरा संघर्ष आहे तो त्या क्षेत्रातील भू-राजकीय प्रबलतेसाठी. गेली अनेक वर्षे पश्चिम आशियाई राजकारण प्रामुख्याने अरब-इस्रायल संघर्ष किंवा अरब राष्ट्रांदरम्यानच्या सत्तासंघर्ष या भोवती फिरत होते. एकेकाळी इजिप्त, सद्दाम हुसेनचे इराक आणि सौदी अरेबिया या बड्या राष्ट्रांचा त्यांत समावेश होता. सद्दाम हुसेन यांच्या पराभवानंतर इराकचे महत्त्व संपून गेले. दरम्यान, इराणने स्वतःला पुढे आणले. एकीकडे आण्विक क्षेत्रात प्रगती आणि दुसरीकडे पश्चिम आशियाई देशांतील शिया गटांना प्रोत्साहन व लष्करी पाठिंबा हे इराणचे धोरण होते. लेबनॉनमध्ये 'हिजबुल्लाह' या पक्षाला पाठिंबा देणे तर येमेनमध्ये 'हौथी' या दहशतवादी संघटनेला दिला गेलेला पाठिंबा ही काही उदाहरणे आहेत. या सगळ्यांमागे इराणची सुस्पष्ट अशी भूमिका आहे. पश्चिम आशियाई सत्ता समतोलाच्या राजकारणात इराण महत्त्वाचा ठरायला हवा, असा प्रयत्न या मागे दिसून येतो. इराणचे वाढते महत्त्व आणि महत्त्वाकांक्षा बराक ओबामा यांनी

नेमकेपणाने जाणली होती. इराणला शांत करण्यासाठी त्यांनी इराणसमवेत आण्विक सहकार्याचा करार केला. पश्चिम युरोपीय राष्ट्रांनाही त्यात सहभागी केले होते. परंतु, त्या करारात अनेक त्रुटी असल्याने ट्रम्प यांनी सत्तेवर येताच त्यातून अंग काढून घेतले आणि इराणवर नवे आर्थिक निर्बंध लादले. इराणला शह देण्यासाठी आता अरब राष्ट्रांनी इस्रायलशी संबंध प्रस्थापित करावेत असे प्रयत्न सुरू आहेत. याचाच पहिला टप्पा म्हणजे, इस्रायल आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यादरम्यान झालेला करार आणि संयुक्त अरब अमिरातीने इस्रायलला दिलेली अधिकृत मान्यता. या व्यतिरिक्त बहारीनबरोबरदेखील असाच करार झाला आहे. सौदी अरेबियाचा या सर्वांना पाठिंबा आहे हा याचा दुसरा अर्थ. या सर्व घडामोडींसाठी ट्रम्प यांनी पुढाकार घेतला होता. त्या मागे धोरण होते ते इराणला शह देण्याचे. पश्चिम आशियाई राजकारणातील आणखी एक नवा घटक म्हणजे तुर्कस्तान. तुर्कस्तामध्ये २०१७ सालापासून Recep Tayyip Erdogan हे सत्तेवर आले आणि तुर्कस्तान कर्मठ इस्लामी भूमिकेकडे झुकत गेला. तुर्कस्तानमध्ये अनेक अंतर्गत बदल होत गेले. त्याच बरोबर, इस्लामिक जगाचे नेतृत्व करण्याच्या महत्त्वाकांक्षेने सौदी अरेबियाला तुर्कस्तानने आव्हान दिले आहे. 'Azerbaijan' आणि 'Armenia' यांच्या संघर्षात 'Azerbaijan'ला तुर्कस्तानचा पाठिंबा आहे. त्याचप्रमाणे, काश्मीरप्रश्नीदेखील पाकिस्तानच्या भूमिकेची तुर्कस्तानने पाठराखण केली आहे. सीरियातील संघर्षातदेखील तुर्कस्तानने हस्तक्षेप केला आहे. गेली अनेक वर्षे 'नाटो'चा (NATO) सदस्य म्हणून अमेरिकेच्या बाजूने शांतपणाने भूमिका घेणारा तुर्कस्तान आता मात्र आपला स्वतंत्र असा 'इस्लामवादी' ठसा उमटवू पाहतो आहे.

**युरोपीय युनियन :** तुर्कस्तानच्या इस्लामिक एकाधिकारशाहीमुळेच त्यांना 'युरोपीय युनियन'चे सदस्यत्व दिले जात नाही. 'युरोपीय युनियन'ची जी मूल्यांची चौकट आहे त्यात तुर्कस्तानचे राजकारण बसत नाही. 'युरोपीय युनियन'ची एकत्रित बाजारपेठ ही जागतिक राजकारणातील अभूतपूर्व अशी घटना होती. अशा प्रकारच्या आर्थिक एकत्रीकरणाचा पाया १९५० सालच्या दशकात सुरूवात झाली. पुढे त्याला चालना मिळाली



आणि १९९२ सालच्या Maastricht Treaty कराराच्या आधारे आर्थिक आणि व्यापारी एकत्रीकरण शक्य झाले. त्याच 'युरोपीय युनियन'च्या पुढ्यात 'ब्रेक्झिट'च्या रूपाने नवीन आव्हान आज उभे ठाकलेले आहे. 'युरोपीय युनियन'मधून बाहेर पडण्याचे ब्रिटनचे अधिकृत कारण म्हणजे त्यांच्या निर्णयस्वातंत्र्यावर येत असलेल्या मर्यादा. 'युरोपीय युनियन'चे कायदे तसेच त्यांच्या न्यायालयाचे निर्णय सर्व सदस्य देशांना बंधनकारक होते. ब्रिटनच्या मते, त्यामुळे त्यांच्या सार्वभौमत्वावर मर्यादा येत होत्या. ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली 'ब्रेक्झिट'ची प्रक्रिया सुरू आहे. वस्तुतः, ब्रिटन बाहेर पडण्याच्या निर्णयामागील खरी कारणे वेगळीच आहेत. सीरियातील यादवी, इराकमधील अस्थैर्य यामुळे युरोपमध्ये मोठ्या संख्येने निर्वासित येऊ लागले. हे निर्वासित भू-मध्य सागरामागे ग्रीस किंवा इटली येथे येत. 'युरोपीय युनियन'च्या नियमांनुसार, निर्वासितांची योग्य ती सोय करून त्या सर्वांना प्रत्येक राष्ट्राच्या ठरलेल्या कोट्यानुसार पाठवले जाते. इस्लामी निर्वासितांमुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडत असल्याचा युरोपिय राष्ट्रांचा आक्षेप होता. त्यामुळे इस्लामी दहशतवाद वाढू लागला. ब्रिटनलादेखील निर्वासितांबाबतचे हे सर्व नियम लागू होते. खरी अडचण तिथे होती. ब्रिटनमध्ये या संदर्भात बरीच चर्चा झाली. परंतु, 'युरोपीय युनियन'चे नियम बंधनकारक असल्याने ते पाळण्याऐवजी राष्ट्रहितासाठी संघटनेतून बाहेर पडावे, असा निर्णय सार्वमताने घेण्यात आला. पश्चिम आशियाई, विशेषतः सौदी अरेबियासारखी, राष्ट्रे निर्वासितांना कोणतीही मदत करीत नाहीत, हे सत्यही या सगळ्या घडामोडींद्वारे पुढे आले.

**रशियाचा राष्ट्रवाद :** 'युरोपीय युनियन'ची दुसरी चिंतेची बाब म्हणजे रशियाचे आक्रमक राष्ट्रवादी धोरण. व्लादिमीर पुतिन सत्तेवर आल्यापासून आक्रमक राष्ट्रवादाचा जो पुरस्कार केला जातो त्याची झळ 'युरोपियन युनियन'लाही जाणवते आहे. एकीकडे 'नाटो'बाबत (NATO) अमेरिकेची उदासीनता आणि दुसरीकडे रशियाचा वाढता दबाव, हे युरोपसमोरील खरे आव्हान आहे. क्रीमियावर रशियाने ताबा मिळवला. युक्रेनमधील रशियनवंशियांना हाताशी धरून तिथेही अडचणी निर्माण केल्या जात आहेत. त्यामुळे युरोपला तेल आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठ्याबाबत

अडचणी निर्माण झालेल्या आहेत. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या निवडणुकीत देखील समाजमाध्यमांचा गैरवापर करून रशिया हस्तक्षेप करीत असल्याचा आरोप अनेकदा झाला आहे. रशियन राष्ट्रवादाच्या निमित्ताने आणखी एक प्रवाह पुढे येताना दिसतो आहे. तो म्हणजे, जागतिकीकरणाच्या संदर्भात असलेला उदारमतवाद आता मागे पडतो की काय अशी शंका उपस्थित होते आहे. रशिया, चीन, अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, भारत, जर्मनी या व इतर काही राष्ट्रांनी आता प्रखर राष्ट्रवादाच्या दिशेने पावले टाकली आहेत. ही राष्ट्रे आपल्या राष्ट्रहिताच्या चौकटीत हा राष्ट्रवाद मांडत आहेत. या भूमिकांना उजव्या विचारसरणीचे सरसकट 'लेबल' लावणे चुकीचे ठरेल. कारण ही राष्ट्रे देशाची सुरक्षा, अर्थव्यवस्था, सामाजिक सुरक्षा आदी जोपासण्याचा प्रयत्न करीत आहेत. अर्थात, याचा अर्थ 'आता जागतिकीकरण संपले' असा मुळीच नाही. जागतिक पातळीवर ज्या औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रांत परस्परावलंबन निर्माण झाले आहे ते मोडणे आताशा कठीण आहे. अनेक क्षेत्रांत पुरवठासाखळ्या (Supply Chains) आज अस्तित्वात आलेल्या आहेत. राष्ट्रवादाच्या नव्या चौकटीतही त्या टिकून आहेत. म्हणूनच अमेरिकेची 'अमेरिका प्रथम' किंवा भारताचे 'आत्मनिर्भर' यांसारखा भूमिका पुढे आल्या म्हणून जागतिक पातळीवरील देवाणघेवाण बंद करणे किंवा संकुचित स्वरूपाचे स्वदेशी धोरण आखणे क्रमप्राप्त नाही.

त्याच अनुषंगाने, आंतरराष्ट्रीय संघटनांकडेही नव्या दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. जगभरात पसरलेल्या 'कोविड' साथीच्या दरम्यान चीन आणि जागतिक आरोग्य संघटना (WHO) यांचे वुहान येथील राजकारण पुष्कळ गाजले. वुहानमध्ये 'कोविड'ची साथ सुरू झाल्यानंतर सुरुवातीला चीनने माहिती दडपून ठेवल्याचा आरोप झाला. साथ सर्वत्र पसरायला लागली तेव्हा चीन कशा पद्धतीने कठोर उपाययोजना करीत आहे, हे सांगण्यास तेथील राज्यकर्त्यांनी सुरुवात केली. जागतिक आरोग्य संघटनेने चीनची बाजू मान्य तर केलीच वर त्यांचे कौतुकही केले. चीन जे सांगत आहे त्यात तितकेसे तथ्य नाही याची जाणीव जागतिक आरोग्य संघटनेलाही असावी. या पार्श्वभूमीवर तिने घेतलेल्या भूमिकेबाबत आश्चर्य व्यक्त केले गेले. **(कृपया पृष्ठ क्रमांक १५ पाहावे)**



*(पृष्ठ क्रमांक ४ वरून)*

भारतीय वास्तवाचा आणि खास करून भविष्यातील संभाव्य चित्राचा वेध या सगळ्या अशा दोलायमान परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपल्याला घ्यावा लागणार आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये कोणीच कोणाचा चिरंतन मित्र अथवा शत्रू नसतो. प्रत्येक देशाचे परराष्ट्रविषयक धोरण आपापल्या स्वार्थाचे संवर्धन-रक्षण करण्याच्या प्रेरणेनेच आखले-राबविले जात असते. ते अर्थातच स्वाभाविक होय. त्यासाठी निकड असते ती आपल्या क्षमता आणि आपले बळ सातत्याने वाढवत राहण्याची. परिणामी, आपल्या देशाच्या भविष्यकालीन वाटचालीची दिशा निश्चित करतवेळी, नाना प्रवाह-प्रवाहांनी गजबजलेल्या आजच्या गुंतागुंतीच्या वैश्विक व्यवस्थेचे आपले आकलन तारतम्यपूर्ण, प्रगल्भ आणि अद्ययावत असणे अतिशय आवश्यक शाबीत होते. हीच बाब डोळ्यांसमोर ठेवून 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकाचे अंतरंग सिद्ध करण्याचा एक नम्र प्रयत्न इथे केला आहे. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

(पृष्ठ क्रमांक १३ वरून)
या संघटनेच्या विश्वासार्हतेबाबत ट्रम्प यांनी सर्वप्रथम प्रश्न उपस्थित केले आणि तेवढ्यावरच न थांबता, जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. एकीकडे संघटनेची ही स्थिती तर दुसरीकडे संयुक्त राष्ट्रांची, विशेषतः सुरक्षा परिषदेची, अडचण आहे. इराक, सीरिया, अझरबैजान-अर्मेनिया यांचे प्रश्न अतिशय गंभीर आहेत. हे संघर्ष रोखण्यात संयुक्त राष्ट्रांना यश आले नाही. तसेच, रशियाची युक्रेन किंवा क्रीमियामधील दांडगाई, दक्षिण चिनी समुद्रामध्ये चालू असलेला चिनी हस्तक्षेप या बाबतदेखील संयुक्त राष्ट्रे काहीही करू शकलेली नाहीत, हेच वास्तव समोर येते. जागतिक स्तरावर ही हतबलता वेळोवेळी सर्वांच्या निदर्शनास आलेली आहे.

**भारत :** आज जगातील प्रादेशिक संघटना बघितल्या तर दोन संघटनांबाबत 'यशस्वी' असा अभिप्राय देता येईल. एक 'युरोपीय युनियन' आणि दुसरी आग्नेय आशियाई राष्ट्रांची The Association of Southeast Asian (ASEAN) ही संघटना. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या सर्व राष्ट्रांची मिळून BRICS ही संघटनादेखील काही प्रमाणात चांगले कार्य करते आहे. रशिया, चीन व मध्य आशिया केंद्रीय शांघाय को-ऑपरेशन (SCO) या संघटनेचा भारतही सदस्य आहे. ही संघटनादेखील मर्यादित स्वरूपात कार्यशील आहे. दक्षिण आशियाई देशांची 'सार्क' ही संघटना सध्या भारत-पाकिस्तान वादात अडकलेली आहे.

अशा संघर्षमय जागतिक वातावरणात भारत स्वतःचे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करतो आहे. 'अलिप्ततावाद' हा शब्द आज केवळ नावापुरता शिल्लक राहिल्याचे दिसते. आपापल्या राष्ट्राचा जागतिक दृष्टिकोन ठराविक विचारप्रणालीच्या चौकटीत मांडण्याचा अट्टहासही आता होताना दिसत नाही. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी १९९१ सालापासून काही प्रमाणात थोड्या धाडसाने एखाद्या विशिष्ट विचारप्रणालीऐवजी राष्ट्रहिताच्या आधारे धोरण आखण्यास सुरुवात केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात त्याला आता अधिक स्पष्ट स्वरूप आल्याचे दिसते. रशियापुरतेच मर्यादित न राहता, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया यांच्याशीदेखील सामरिक



पातळीवर आता अधिक खुलेपणाने संवाद सुरू झालेला आहे. चीनचा संभाव्य धोका लक्षात घेऊन 'क्वाड' (QUAD) ही सामरिक नीती आखण्यासाठी अमेरिका, भारत, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांनी हातात हात गुंफले आहेत. नरेंद्र मोदी यांच्या काळात पाकिस्तान आणि चीन यांच्याबाबतीत वेळप्रसंगी (लष्करी) बळाचा वापर करण्याची तयारी भारताने दाखवली आहे. या आधी अशी असाच कणखर पवित्रा माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९७१ सालच्या युद्धादरम्यान दाखवला होता. पंडित नेहरू यांच्याबाबतीत बोलताना कायम त्यांच्या शांततामय सहजीवनवादी भूमिकेचा निर्देश केला जातो. परंतु, लष्करी बळाच्या उपयुक्ततेबाबत त्यांचे वक्तव्य अतिशय बोलके होते. Tibor Mende यांना दिलेल्या प्रदीर्घ मुलाखतीत लष्करी बळाची उपयुक्तता त्यांनी मान्य केली. परंतु, धोरणांबाबत बोलताना ते म्हणाले होते की, 'या बाबत सतत ओरडून सांगण्याची गरज आहे का?, दुस-या राष्ट्रांना सतत धमक्या देण्याची गरज आहे का?' नेहरू कालीन त्या संदिग्ध भूमिकेच्या चौकटीपासून भारत आता बराच दूर आला आहे. भारताने आण्विक, अवकाश तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक यांसारख्या अनेकानेक क्षेत्रांत बरीच प्रगती केलेली आहे. भारताकडे आण्विक शस्त्रांचीही क्षमता आहे. क्षेपणास्त्रांबाबत आत्मविश्वास आहे. भारतात राजकीय स्थैर्य आहे. आर्थिक क्षेत्राचीदेखील प्रगती होते आहे. म्हणूनच, जगाला उद्देशून काही निश्चित भूमिका भारत घेऊ शकतो. नव्या जागतिक व्यवस्थेमध्ये भारताला दुर्लक्षून पुढे जाता येणार नाही, हाच इशारा जागतिक सत्ताव्यवस्थापन करणा-या बड्या सत्तांना भारत देतो आहे. किंबहुना, त्या जागतिक व्यवस्थेमध्ये भारताला महत्त्वाचे स्थान आता हवे आहे.

**जागतिक व्यवस्था :** जागतिक व्यवस्थेबाबत आज नवी समीकरणे जुळून येताना दिसत आहेत. शीतयुद्धाच्या काळातील लष्करी गटांचे राजकारण आता संपुष्टात आलेले आहे. त्याच बरोबर, 'साम्यवाद विरुद्ध भांडवलशाही' हा वैचारिक वादही आता लोप पावलेला आहे. बाजारपेठीय अर्थकारणाच्या धोरणदृष्टीने आता त्याची जागा घेतली आहे. गंमत अशी की, प्रत्येक राष्ट्र आपापल्या विचारप्रणालीच्या आधारे बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलत असते. अमेरिकेत अजूनही भांडवलशाही संस्कृती जागृत आहे.

म्हणून तिथे आज 'भांडवलशाही बाजारपेठीय अर्थव्यवस्था' दिसून येते. तर, चीनमध्ये कम्युनिस्ट पक्षाने साम्यवाद अद्याप सोडलेला नाही. म्हणून तेथील व्यवस्था 'साम्यवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्था' म्हणून ओळखली जाते. भारताने १९९१ सालानंतर समाजवादी व्यवस्थेला नकार दिला. परंतु, राजकीय नेतृत्व अजूनही जनतेसमोर साम्यवादाचा बुरखा घालून वावरताना दिसते. म्हणूनच भारताच्या अर्थव्यवस्थेचे वर्णन करताना 'बाजारपेठीय' हा शब्दप्रयोग न करता 'आर्थिक उदारीकरण' हा तटस्थ शब्द इथे वापरलेला आहे. त्याचप्रमाणे, सरकारी उद्योगधंद्यांचे 'खासगीकरण होते' असे न म्हणता, 'Restructuring' हा निरुपद्रवी शब्द वापरला जातो. सुरक्षाविषयक क्षेत्रात आता 'सामरिक भागीदारी' हा शब्द रुढ होतो आहे. अशा प्रकारच्या सामंजस्य करारांमध्ये आर्थिक, राजकीय, सुरक्षाविषयक व इतर क्षेत्रांत सहकार्य करण्याची भूमिका अध्याहृत असते. पारंपरिक स्वरूपाचे लष्करी करार म्हणून ते गणले जात नाहीत. त्यामुळे तिथे 'मित्र-शत्रू' असा भेदभाव केला जात नसतो. त्या भागीदारीमध्ये लवचिकता दिसून येते. पारंपरिक लष्करी करारात ती कधीच नसते. नव्या संदर्भात ती लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. उदाहरणार्थ, भारताने अशा प्रकारचे सामरिक भागीदारीचे करार अमेरिका, रशिया, फ्रान्स, ब्रिटन, व्हिएतनाम, बांगलादेश, अफगाणिस्तान इत्यादी राष्ट्रांशी केलेले आहेत.

युद्धपद्धतीत होत गेलेला बदल हे या बदलांमागचे एक महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे, आजच्या पद्धतीला 'हायब्रिड युद्धपद्धती' (Hybrid warfare) असे संबोधले जाते. या पद्धतीने केल्या जाणाऱ्या युद्धांमध्ये केवळ पारंपरिक पद्धतीचे युद्ध न लढता त्याच्या बरोबरीने आर्थिक, राजकीय, सामाजिक अशा विविध पातळ्यांवर आघात केले जातात. आधुनिक दहशतवादसुद्धा याच स्वरूपाचा आहे. केवळ लष्करी किंवा नागरी ठिकाणांवरच हल्ले केले जातात असे नव्हे तर, समाजमाध्यमे, वृत्तपत्रे, राजकीय व्यासपीठे या सर्वांचाच त्यासाठी खुबीने वापर केला जातो. या नव्या युद्धपद्धतीत आता आधुनिक तंत्रज्ञानाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. सायबर हल्ले, 'हॅकिंग' ही युद्धासाठी वापरली जाणारी आयुधे आहेत. जगभरातील संघर्षांचे आजचे स्वरूप हे राजकीय, आर्थिक, सामाजिक,



लष्करी असे संमिश्र आहे. नागरी समाजाच्या पातळीवर लढा देणे हा त्यातीलच एक नवीन पैलू. स्वयंसेवी संस्था, अ-राष्ट्रीय घटक यांचे महत्त्व खूप वाढलेले आहे. त्यात 'ॲमनेस्टी' किंवा 'ग्रीन पीस' या सारख्या आंतरराष्ट्रीय संस्था असतील, वेगवेगळ्या धार्मिक संस्थांनी पाठिंबा दिलेल्या संघटना असतील, स्थानिक पातळीवर समस्या मांडणारे गट असतील किंवा अगदी दहशतवादी गटही असतील, या सर्वांचा राष्ट्रांमधील हस्तक्षेप वाढला आहे. मानवी कल्याणाच्या नावाखाली अशा संघटना अनेकदा विकासाच्या प्रयत्नांमध्ये अडथळे आणत राहतात. अनेकदा मानवी हक्कांचे स्तोम माजवले जाते. मानवी हक्कांबाबतचे दृष्टिकोनही बघण्यासारखे आहेत. पाश्चिमात्य देशांत नागरी हक्क आणि स्वातंत्र्य यांना सर्वोच्च स्थान दिले जाते. तर, भारतासारख्या देशात अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य हे अधिक महत्त्वाचे मानले जाते. परंतु, इथे काम करणाऱ्या बहुतांश संघटना पाश्चिमात्य चौकटीचाच वापर करताना दिसून येतात. अशा संघटनांचा हस्तक्षेप कितपत असावा, देशाच्या सार्वभौमत्वाचे प्रश्न कसे हाताळावेत...अशा सर्वचबाबतींत संतुलन साधणे गरजेचे आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर तसेच संयुक्त राष्ट्रांच्या निर्मितीनंतर जगात आता अनेक बदल झाले आहेत. आजच्या संघर्षाच्या राजकारणात शांतता नसली तरी स्थैर्य आहे असे मानले जाते. जगाच्या पटलावर लहान राष्ट्रांना आता थोडेफार स्थान मिळू लागल्याचे आश्वासक चित्र बघायला मिळते. त्यांचा आवाज आता ऐकू येऊ लागला आहे. परंतु या सर्व गोष्टींकडे बघण्याचा चीनचा दृष्टिकोन मात्र वेगळाच आहे. चीनच्या मते, 'जगात आता समानता आहे.' संयुक्त राष्ट्रांमध्ये सर्व राष्ट्रांना मत व्यक्त करण्याचा अधिकार समान आहे. चीन असो किंवा नेपाळ, अमेरिका असो किंवा श्रीलंका या प्रत्येक राष्ट्राला स्वतःचे मत आहे. परंतु प्रत्यक्षात पाहता, जगात काही मोठ्या सत्ता आहेत तर काही छोट्या. समुद्रात जसे मोठे मासे असतात तसे छोटेही असतात आणि सर्वांना समुद्र खुला असतो. पण प्रत्यक्षात मोठे मासे लहान माशांना खातात हीदेखील वस्तुस्थिती आहे. आजच्या जागतिक व्यवस्थेकडे पाहताना त्याच वस्तुस्थितीचे भान राखणे क्रमप्राप्त ठरते. ■■

संरक्षण

# चिनी कुरापती की युद्धाची खुमखुमी?

## (अ) पार्श्वभूमी :

'चीन' हे देशनाम निव्वळ उच्चारले जरी तरी सर्वसामान्य भारतीयाच्या मनामध्ये आठवणी जाग्या होतात त्या १९६२ साली त्या देशाबरोबर झडलेल्या लष्करी संघर्षात पत्करावा लागलेल्या मानहानीकारक पराभवाच्या. तेव्हापासून चीनबाबत, कितीही नाही म्हणले तरी, एक प्रकारचा दबदबा अबोध मनामध्ये दाटून राहिलेला दिसतो. "वो अगर चीन हैं तो हम प्राचीन हैं", अशा आशयाचे आश्वासक उद्गार काढत चिनी सामर्थ्याचा अकारण अतिरिक्त बाऊ करण्याचे कारण नाही, अशा आशयाचा धीर दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी पूर्वी केलेला असला तरी, सीमेपलीकडील या आक्रमक विस्तारवादी, धूर्त आणि कावेबाज शेजारी देशाच्या सुप्तासुप्त हेतूंबाबत कायमच सभय साशंकता नांदत असते. विशेषतः, २०२० सालातील मे महिन्यापासून भारताच्या सीमावर्ती प्रदेशात ठिकठिकाणी चीनने ज्या पद्धतीने आगळीक चालू केलेली आहे त्यांमुळे तर शंकेची सावट अधिकच गडद बनलेली आहे.

लडाखमधील पेन्गॉन्ग सरोवराच्या परिसरातील चीन आणि भारत यांच्यादरम्यानची सीमा चिनी दाव्यांनुसार वादग्रस्त आहे. या परिसरातच २०२० सालातील मे महिन्यामध्ये भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये चकमकीची पहिली ठिणगी पडली. त्याच्या जोडीनेच, पूर्व लडाखमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळदेखील दोन्ही बाजूंच्या सैनिकांमध्ये हातघाई झाली. गलवान खो-यात भारतीय हद्दीमध्ये सीमावर्ती भागांत भारत करत असलेल्या रस्तेबांधणीस चिनी सैनिकांनी आक्षेप घेत विरोध केल्याने त्याच सुमारास पुन्हा तणाव अधिकच गहिरा बनला. २०२० सालातील जून महिन्याच्या मध्यास झडलेल्या चकमकीमध्ये २० भारतीय जवान मृत्युमुखी पडले.



भारताच्या सीमावर्ती भागात बखेडे उत्पन्न करण्याचा चीनचा हा सिलसिला गेली तीन वर्षे चालू आहे. चीन आणि भारताचे मित्रराष्ट्र असणारा भूतान या दोघांचाही दावा असणा-या डोकलाम येथे रस्ते बांधण्याचे काम चीनने १६ जून २०१७ या दिवशी अकस्मातच चालू केले आणि वादाची पहिली ठिणगी पडली. त्या नंतर तिस-या दिवशी, म्हणजे, १८ जून २०१७ रोजी भारतीय सैन्याच्या सशस्त्र तुकडीने बुलडोझर बरोबर घेऊन सिक्कीमची हद्द ओलांडली आणि डोकलाम येथे रस्तेबांधणी करणा-या चिनी सैनिकांना रोखले. वातावरणातील तणाव साहजिकच वाढला. उभय देशांमध्ये चर्चेच्या फे-या चालू झाल्या आणि आपापले सैन्य डोकलाममधून मागे घेत असल्याची घोषणा भारत आणि चीन अशा दोघांनीही २८ ऑगस्ट २०१७ या दिवशी केली.

त्या नंतर बरोबर तीन वर्षांनी आता पुन्हा चीनने आगळीक केली. सीमावर्ती भागात वेगवेगळ्या माध्यमांतून अशांतता व अस्थिरता नांदत ठेवण्यामागे चीनचा आंतरिक हेतू काय असावा, हा प्रश्न या सगळ्या घडामोडींपायी ऐरणीवर येतो. मुळात, चिनी राज्यकर्त्यांची मानसिकता पूर्वापार निखळ विस्तारवादीच राहिलेली आहे. त्या भावनेला एक अत्यंत प्राचीन असे सांस्कृतिक अस्तर जोडलेले आहे. उभ्या विश्वावर सत्ता प्रस्थापित करणे, हे चीनचे दैवदत्त कर्तव्यच होय अशा प्रकारची एक भावना चिनी समाजाच्या विचारविश्वात अनादी काळापासून नांदत आलेली आहे. किंबहुना, उभ्या जगाचा सत्तातोल हा चिनीकेंद्री राहावा, हाच ईश्वरी संकेत आहे अथवा असावा, अशा प्रकारची धारणा चिनी मनोविश्वात दृढ बनलेली आहे. मधल्या काळात वैश्विक सत्तेचा चीनकेंद्रीत मध्यवर्ती आस ढळल्यामुळे त्या ईश्वरी संकेताची जणू पायमल्ली घडून आली आणि चीनची झालेली ती स्थानभ्रष्टता सावरून चीनला पुन्हा एकवार त्याच्या दैवदत्त स्थानावर पुनर्स्थापित करण्याचे उत्तरदायित्व विद्यमान पिढ्यांवर आहे, अशी एक बळकट मनोधारणा चिनी समाजात नांदते आहे, असे काही अभ्यासकांचे विश्लेषण आहे. आजघडीला एकंदरच वैश्विक सत्तापटलावर ज्या पद्धतीने चिनी पावले पडताना दिसत आहेत त्यांमागील हेतूंचा उलगडा या सगळ्या अशा गुंतागुंतीच्या पार्श्वपटावर करून घेणे भाग आहे.

सोव्हिएत संघराज्याची शकले होण्यापूर्वी सोव्हिएत संघराज्य आणि अमेरिका या दोन सत्ताशिखरांमध्ये जगाचा सत्तातोल विभागला गेलेला होता. परंतु, १९८९ साली सोव्हिएत साम्राज्याचे विघटन झाले आणि त्या नंतर वैश्विक सत्तापट सामरिक, आर्थिक, वैज्ञानिक अशा सर्वच दृष्टींनी अमेरिकाकेंद्री बनत गेला. त्यामुळे, जगातील एकल महासत्ता म्हणून अमेरिकेचा दबदबा कायम राहिला. दरम्यान, १९८० सालानंतर चीनमध्ये आर्थिक सुधारणांनी गती घेतली. सुरुवातीपासून आंतरराष्ट्रीय व्यापार हे चीनने आर्थिक विकासाचे गमक ठरवले. एक प्रबळ आर्थिक सत्ता बनण्याच्या दिशेने चीनची वाटचाल सुरू झाली. चीन व अमेरिका यांच्यामध्ये जे व्यापारी नाते तयार झाले ते चीनच्या पथ्यावर पडणारे होते आणि त्यातून चीनची आर्थिक सुबत्ता वाढू लागली. परंतु, तेवढ्यावरच समाधानी न राहता अत्यंत धोरणीपणाने चीनने आपले लष्करी सामर्थ्य वाढवण्यास सुरुवात केली. त्यामुळे जगाच्या क्षितिजावर 'चीन' नावाच्या आणखी एका महासत्तेचा उदय होऊ लागल्याचे दिसू लागले आणि पुन्हा एकदा जगाचा सत्तातोल द्विकेंद्री होण्याच्या शक्यता निर्माण होऊ लागल्या.

जगावर वरचष्मा राखण्याच्याबाबतीत कटाक्ष राखणा-या अमेरिकेला, उभरती महासत्ता म्हणून डोके वर काढत असणारा चीन डोळ्यांत खुपायला सुरुवात झाली आणि या दोन देशांत संघर्षाची ठिणगी पडली. वाढत चाललेले आर्थिक सामर्थ्य, निर्यातप्रधान आर्थिक नीती, युरोपीय व अमेरिकी बाजारपेठांत निर्माण केलेले वर्चस्व, जगाचे उत्पादन केंद्र म्हणून स्वतःचा घडवून आणलेला विकास यांमुळे पाश्चिमात्य जगासोबत चीनचे घनिष्ठ संबंध प्रस्थापित बनले. या वाढत्या सामर्थ्यामुळे, दक्षिण आशियामध्येही एकल सत्ता म्हणून आपल्याकडेच जगाने पाहायला हवे, अशी चिनी महत्त्वाकांक्षा उघडपणाने दिसू लागली. भारताच्या संदर्भात विचार करायचा झाल्यास, चीन कधीही भारताचा शांतताप्रिय शेजारी नव्हता. १९६२ सालचे युद्ध आणि त्याच्याही आधीपासून चीनच्या कुरापाती या ना त्या स्वरूपात सुरूच राहिलेल्या आहेत. दक्षिण आशियात भारताच्या रूपाने समांतर सत्ताकेंद्र उभे राहू शकते त्यामुळे तिथेही आपलेच वर्चस्व असायला हवे, हे लक्षात घेऊनच चीनच्या कागाळ्या सातत्याने सुरू असतात.



चीनच्या या महत्त्वाकांक्षी धोरणांना पहिला धक्का बसला तो अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनल्ड ट्रम्प हे निवडून आल्यानंतर. अमेरिकी सत्तेची सूत्रे २०१६ साली हाती पेलल्यापासून ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' हे धोरण अवलंबल्याने चीनच्या व्यापारकेंद्री निर्यातप्रधान आर्थिक विकासाच्या धोरणाला आव्हान दिले गेले. चीनने आंतरराष्ट्रीय व्यापारात जो वरचष्मा प्रस्थापित केलेला होता त्यावरही ट्रम्प यांनी अनेक ठिकाणी प्रश्नचिन्ह उभे केले आणि चिनी वर्चस्वाला थेट आव्हान दिले. चीन आणि अमेरिका यांचे संबंध बदलू लागले. या सगळ्यामध्ये चीनचा सख्खा शेजारी म्हणून भारताचीही भूमिका अर्थातच महत्त्वाची ठरत होती.

जागतिक संदर्भात आज चीनची जी अस्वस्थता आहे त्या मागची कारणमीमांसा महत्त्वाची आहे. चिनी नेतृत्वाने केलेले सत्तेचे केंद्रीकरण, 'सबप्राइम क्राइसिस'चा फुटलेला फुगा, आर्थिक प्रगतीची घोडदौड थांबून चीनची सुरू झालेली घसरण, देशांतर्गत परिस्थितीत निर्माण झालेले असमतोल, त्यांतून धुमसणारा असंतोष, अन्नसुरक्षेचा प्रश्न असे अनेकानेक पैलू या सगळ्या विषयाला आहेत. त्यामुळे डोकलामपासून आतापर्यंतच्या ताज्या घटनांचा वेध घेताना चीनकडून सुरू असलेल्या कुरापती, या चिनी जनतेचे लक्ष अंतर्गत समस्यांवरून दूर हटवण्यासाठी केलेल्या खेळी आहेत की खरोखर चीनला वर्चस्ववादी भूमिकेतून अंतिमतः पुन्हा एकदा युद्धच करायचे आहे, हेदेखील समजून घ्यावे लागेल. श्रीलंका आणि नेपाळ या देशांची चीनकडून केली जाणारी पाठराखण, ग्वादार बंदर, 'सिल्क रूट', पाकव्याप्त काश्मीरमध्ये चिनी सैनिक पाठवणे, तिथे पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी पाकिस्तानला मदत करणे, नेपाळ, श्रीलंका यांना अंकित करून भारताच्या सगळ्या शेजारी देशांना भारताविरोधात भडकवून सतत भारताच्या सीमा असुरक्षित कशा राहतील हे पाहणे... या सगळ्या गोष्टी चीनच्या राक्षसी विस्तारवादी महत्त्वाकांक्षेचे द्योतक आहेत किंवा कसे, हे बघावे लागेल. दक्षिण आशियामध्ये समांतर सत्ताकेंद्र उभे राहू नये म्हणून मर्यादित तीव्रतेची युद्धमान परिस्थिती कायम ठेवत भारताचे लचके तोडायचे आहेत की भविष्यात खुलेआम दोन हात करण्याच्या दृष्टीने सुरू असलेली ही पूर्वतयारी आहे, हे देखील याच संदर्भात अभ्यासावे लागेल.

संरक्षण

# चिनी कुरापती की युद्धाची खुमखुमी?

● एअरमार्शल (निवृत्त) भूषण गोखले

## (ब) सद्यःस्थिती :

डोकलामपासून अगदी अलीकडच्या काळातील चीनच्या कुरापती पाहता केवळ त्या एकेका घटनेकडे पाहून तिचा अन्वयार्थ लावणे पुरेसे ठरणार नाही. २०१७ सालापासून गेली चारएक वर्षे या ना त्या कारणाने आणि कोणत्या ना कोणत्या माध्यमातून भारताबरोबरच्या सीमाप्रश्नासंदर्भात जी खुसपटे शोधून-उकरून चीन काढतो आहे त्या सगळ्यांची पाळेमुळे सुदूर इतिहासात चांगल्यापैकी खोलवर रुजलेली असून आजच्या अस्वस्थ वर्तमानाशीही त्याचा सांधा जुळलेला आहे. इतिहासात डोकावले तर आपल्याला असे आढळून येते की, जम्मूवर पूर्वी शिखांची सत्ता होती. गुलाबसिंग हे तेथील सम्राट होते. आपल्या सीमांचा विस्तार करावा म्हणून १८४१ साली त्यांनी लडाखवर आक्रमण केले. इतकेच नव्हे, शीख सैनिक चीनच्या सीमेतही घुसले होते. जनरल जोरावरसिंग यांनी सहा हजार शीख सैनिकांसह लडाखवर चढाई केली आणि दमदार विजय संपादन केला. त्या दणक्यामुळे चिनी शासनकर्त्यांच्या मनांत शिखांच्या पराक्रमाची जरब निर्माण झाली. तेव्हापासून लडाख हा भारताचा अविभाज्य भाग बनला. इतिहासात याची सुस्पष्ट नोंद असतानाही चीन मात्र सातत्याने घुसखोरी करून तेथील भूमी बळकावण्याचा प्रयत्न करताना दिसतो.

चीनबरोबर १९६२ साली झालेल्या युद्धात भारताला पराभवाची नामुष्की पत्करावी लागली होती. ती जखम अद्याप भरलेली नाही. परंतु, 'तेव्हाचा भारत' आणि 'आजचा भारत' यात खूप अंतर आहे. चीनलादेखील याची पूर्ण जाणीव आहे. लेह, लडाख, सियाचीन या भागांत पूर्वी पायाभूत सोयीसुविधांची मोठी वानवा होती. पुरेसे रस्ते नव्हते. तेथील कडाक्याच्या



थंडीचा सामना करीत लढण्यासाठी आवश्यक कपडेही भारतीय सैनिकांना उपलब्ध झालेले नव्हते. आता मात्र अशी परिस्थिती निश्चितच राहिलेली नाही. सियाचीनमध्ये भारताचा सुसज्ज तळ तयार झालेला आहे. या भागांतील भारताची ठाणी उंचावर असल्याने शत्रू मा-याच्या टप्प्यात आहे. सीमेवर सज्ज असलेल्या सैनिकांना आता अनेक सुविधा आणि पुरेशी शस्त्रसज्जता लाभलेली आहे. चीनच्या सीमेपलीकडील अनेक महत्त्वाची ठिकाणे, महत्त्वाचे पूल, रस्ते भारताच्या क्षेपणास्त्रांच्या टप्प्यात आहेत. पूर्वी जिथे जाणेही दुरापास्त होते तिथे आता सहज जाता येऊ शकेल असे रस्ते भारताने तयार केलेले आहेत. डोकलाम किंवा लडाखमध्ये चीनने घुसखोरी केली ही वस्तुस्थिती मान्य केली तरीही भारतीय लष्कराने तितक्याच तत्परतेने या परिस्थितीवर नियंत्रणही मिळवलेले आहे. वस्तुतः, एखाद्या देशाचा भूभाग बळकावून त्या देशाचे शत्रूत्व पत्करणे हे आजच्या संदर्भात काही सूज्ञपणाचे पाऊल ठरणारे नाही. याची जाणीव असूनदेखील वारंवार भारताच्या सीमेमध्ये घुसखोरी करून चीनच्या कुरापती सातत्याने सुरू असतात. चीन हे सातत्याने का करीत असावा या कारणांचा शोध घेणे या सगळ्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरते.

भारतातील लेह, लडाख, सियाचिनंमध्ये घुसखोरीचे प्रयत्न करून भारतीय भूभाग बळकावण्याचा चीनचा सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू आहे त्यामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे तेथील पर्वतरांगांमध्ये दडलेली मौलिक खजिनसंपत्ती हे असावे. उघडपणाने हे कारण सांगितले जात नसले तरीही चीन यावर बारीक लक्ष ठेवून आहे, ही वस्तुस्थिती आहे. कारगीलहून लेहकडे जाताना विपुल खनिजसंपत्ती असणारी Garnet Hill, चुंबकीय शक्ती असणारी 'मॅग्नेट हिल' अशा अनेकानेक टेकड्या या परिसरात आहेत. वर्षानुवर्षे इथे राहणा-या स्थानिक लोकांना येथील संपन्नतेची चांगली माहिती आहे. चीनचे या भूभागावर म्हणूनच अधिक लक्ष आहे.

भारतीय भूभाग बळकावण्याची आणि भारताची जमेल त्या पद्धतीने सगळीकडून कोंडी करण्यासाठी चीनचे जे जोरकस प्रयत्न सुरू आहेत ते पाहता हा संघर्ष लवकर संपणार नाही हे तर खरेच; परंतु, या प्रश्नांची सोडवणूक करीत असताना भारत चर्चेच्या पातळीवर आणि मुत्सद्देगिरीमध्ये

मागे पडणार नाही हे मात्र पाहायला हवे. युद्धाचा प्रारंभ कसा होतो यापेक्षाही त्याची इतिश्री किती हुशारीने केली जाते हे महत्त्वाचे असते. आजवरच्या इतिहासावर नजर टाकली असता लक्षात येते की, १९४७-४८ आणि १९७१ सालच्या युद्धांमध्ये भारताने विजय संपादन केला खरा. परंतु, या दोन्ही युद्धांची अखेर होताना मुत्सद्देगिरीत मात्र भारत कमी पडला. भारतीय लष्कराने दमदार विजय संपादन करूनदेखील भारताच्या वाट्याला विशेष काही आले नाही. या पुढील काळात तरी याची दक्षता निश्चितपणाने घ्यावी लागेल. चीनच्याबाबतीत तर अधिक सावधगिरी बाळगून सर्व तिढ्यांतून मार्ग काढावे लागतील. डोकलामपासून ते अगदी अलीकडच्या ताज्या घटनांमागील चिनी मनसुबे लक्षात घेता कोणत्याही पातळीवर गाफील राहून चालणार नाही.

भारतीय सीमांमध्ये होणारी चिनी घुसखोरी म्हणजे त्यांच्या वर्चस्ववादी मानसिकतेचेच निदर्शक आहे. चीनची सत्तालालसा आणि सतत सर्वांच्या पुढे राहण्याची महत्त्वाकांक्षा या पूर्वीही वेळोवेळी उघड झालेली आहे. संपूर्ण दक्षिण आशियात आपलाच एकछत्री अंमल असावा असे चीनला कायमच वाटत आले आहे. या चिनी महत्त्वाकांक्षेला समर्थ आव्हान देऊन तिच्यासमोर उभे ठाकण्याची क्षमता फक्त भारताकडेच आहे आणि चीनला कोणत्याही परिस्थितीत समांतर सत्ताकेंद्र उभे राहू द्यायचे नाही. भारताशी चीनचा उभा दावा आहे तो यासाठीच. भारतीय क्षमता आणि सामर्थ्याची चीनला पुरेपूर जाणीव आहे. त्यामुळेच चीनचा भारतविरोध अधिक तीव्र आहे. शक्य तितक्या मार्गांनी भारताची कोंडी करीत राहावी, जमेल त्या मार्गाने त्रास द्यावा, संधी मिळेत तितके नुकसान करावे आणि या सगळ्यांतून अतिंमतः आपला फायदा करून घ्यावा, हे चिनी मनसुबे आता लपून राहिलेले नाहीत.

भारताच्या आजूबाजूला असलेल्या सर्व शेजारी राष्ट्रांना अंकीत करून त्यांना भारताच्या विरोधात सातत्याने चिथवत ठेवणे हादेखील चिनी डावपेचांचाच एक भाग आहे. वस्तुतः भारतीय सीमेला लागून असणारे पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका हे सर्व देश भारताकडे भीती आणि आदर अशा दृष्टीने पाहतात. या अंतर्द्वंद्वाचा अचूक लाभ उठवण्याचा



प्रयत्न चीन सातत्याने करताना दिसतो. भारताच्या सीमेवर निर्माण होणा-या असंतोषाला खतपाणी घालण्याचे आणि संधिसाधूपणाने त्यांना पाठबळ देण्याचे काम चीन करीत राहतो. परिणामस्वरूप, चिनी पाठिंब्यामुळे छोट्या राष्ट्रांचाही आवाज भारतासमोर उंचावतो. पाकिस्तानही भारताला इशारे देत राहतो आणि शत्रुत्व वाढवत राहतो. पाकिस्तानमधून सातत्याने भारतात होणारी घुसखोरी, दहशतवादी कारवाया या सगळ्यांना चिनी पाठबळ असते, हे आता लपून राहिलेले नाही. सीमेवरच्या अन्य छोट्या राष्ट्रांनाही भरीस घालून भारताला आणखी कसे कोंडीत पकडता येईल असा प्रयत्न चीन करताना दिसतो. एखाद्या देशाच्या मनात भारताविषयी खदखद किंवा असंतोष आहे असे लक्षात येताच शक्य तितके खतपाणी देण्याचा प्रयत्न चीन हिरिरीने करतो. साहजिकच, शेजारी देशांनाही भारताकडून मिळेल तितके ओरबाडून घेण्याची सवय लागलेली आहे. परंतु, सहनशीलतेलाही मर्यादा असतात. त्यामुळे भारतही आता अशा कोणत्याही विषयांबाबत कठोर भूमिका घेऊ लागला आहे. कुठल्याही दबावाखाली न झुकता ठोस भूमिका घेऊन प्रसंगी चीनला खडसावण्यातही भारत कसूर करीत नाही. बदलत्या भारताचे हे चित्र नक्कीच आश्वासक म्हणावयास हवे.

समुद्रावरही चीनचा डोळा आहेच. समुद्रावरही चीनला अनिर्बंध सत्ता हवी आहे. वस्तुतः, ‘एक्सक्लुझिव्ह इकॉनॉमिक झोन’ अंतर्गत किनारपट्टीच्या परिसरातील तब्बल ३० लाख चौरस किलोमीटर इतक्या प्रचंड भागावर व समुद्रकिनारपट्टीवर संपूर्ण हक्क भारताचा आहे. येथील तेल, जैव इंधन, खनिजसंपत्ती यांचा वापर करण्याचा तसेच व्यावसायिक तत्त्वावर मासेमारी करण्याची परवानगी कुणाला द्यायची आणि कुणाला नाकारायची या संबंधातील पूर्ण अधिकार भारताकडे आहेत. चीनची पोटदुखी आहे ती तिथेच आणि नेमकी तीच! त्यामुळेच, चीनचा हस्तक्षेप सर्वत्र वाढला आहे. समुद्रसंपत्ती हा एक महत्त्वाचा स्रोत लक्षात आल्याने समुद्रात कृत्रिम बेट उभारून अत्यंत धोरणीपणाने पावले टाकण्यास चीनने सुरुवात केलेली आहे. या प्रकारच्या चिनी हस्तक्षेपाला आणि घुसखोरीला भारतच नव्हे, तर इंडोनेशिया, मलेशिया आदी देशही वैतागलेले आहेत.

वर्चस्ववादी भूमिकेतून सगळ्यांना त्रस्त करणारा चीन अलीकडील काळात अनेकानेक अंतर्गत समस्यांनी तितकाच वेढलेला आहे. चीनची तिथे देशांतर्गत कोंडी झालेली आहे. त्याची कारणेही तितकीच महत्त्वाची आहेत. लोकसंख्या अधिक असली तरीही भारतात ६० टक्क्यांहून अधिक जमीन उपजाऊ आहे. त्यामुळे भारताला अन्नधान्यासाठी आयातीवर फारसे अवलंबून राहावे लागत नाही. या उलट, चीनमधील एकूण भूभागाच्या तुलनेत तेथील उपजाऊ जमीन जेमतेम १६-१७ टक्के आहे. त्यामुळे तेथील विशाल लोकसंख्येची गरज भागू शकेल इतक्या मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचे उत्पादन होत नाही. परिणामी, चीनला अन्नधान्यासाठी आयातीवर अवलंबून राहावे लागते. चीनच्या पुढ्यात अन्नसुरक्षेसंदर्भातील आव्हान मोठे आणि जटिल आहे. त्यासाठी आजघडीला अन्नधान्याची आयात विविध देशांतून समुद्रमार्गाने मोठ्या प्रमाणावर करण्याशिवाय चीनपुढे दुसरा पर्याय नाही. समुद्रमार्गे होणारी आयात विनाअडथळा आणि निर्धोक असणे ही चीनची प्राथमिक गरज आहे. समुद्रमार्गाने केल्या जाणा-या अन्नधान्याच्या आयातीमध्ये भविष्यात कोणत्याही स्वरूपाचा अडथळा उद्‌भवू नये अथवा कुणीही त्यासाठी आडकाठी करू नये म्हणूनच चीनला समुद्रावर एकहाती वर्चस्व हवे आहे. ग्वादार बंदर किंवा श्रीलंका, बांग्लादेश, म्यानमार यांचे काही प्रश्न असतील तरी चीन त्यात लगेचच लक्ष घालतो त्याचे कारण हेच.

आणखी एक धोकादायक बाब चीन जाणून आहे. ती म्हणजे, भारत-चीन संबंधांत अधिक वितुष्ट येऊन परिस्थिती उद्या खरेच विकोपाला गेली आणि युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली तर भारत अनेक मार्गांनी चीनची कोंडी करू शकतो. समुद्रमार्गे पुरवठा होणारी अन्नाची रसद तोडून चीनला नामोहरम करता येणे भारताला सहजशक्य आहे, हे चीन पूर्णपणे जाणून आहे आणि म्हणूनच भारताला शक्य तितके नामोहरम करून चीनला दक्षिण आशियाई समुद्रावर फक्त त्याचीच सत्ता हवी आहे. भारताचे समर्थ आव्हान चीनसमोर सज्ज असताना चिनी मनसुबे पूर्णत्वास जाणे इतके सहजशक्य नाही. हे चीन जाणून आहे. आपल्या वाटेतील एक मोठा अडथळा म्हणून चीन भारताकडे पाहतो आहे. चीनचा भारतावर राग आहे तो यासाठीच.



पाकिस्तानमध्ये विविध कारणांनी निर्माण होणा-या असंतोषाची धग कमी करण्यासाठी भारतविरोधाचे हुकमी हत्यार सत्ताधा-यांकडून वापरले जाते आणि राष्ट्रवादाचा मुद्दा पुढे करून मूळ प्रश्नांवरून जनतेचे लक्ष विचलित केले जाते. चीनसुद्धा अशाच काहीशा परिस्थितीतून सध्या जातो आहे. काही वर्षांपूर्वी आर्थिक घोडदौड अत्यंत वेगाने करीत जाणारा आणि अवघ्या जगाला थक्क करून सोडणारा चीन सध्या मात्र विविध अडचणींचा सामना करतो आहे. देशांतर्गत अनेक समस्यांनी हा देश वेढलेला आहे. चीनच्या आर्थिक सुधारणांच्या घोडदौडीला एव्हाना लगाम बसलेला आहे; किंबहुना, आर्थिक विकासाचा दर घसरलेला आहे. अन्नसुरक्षिततेपासून आर्थिक बाबींपर्यंत अनेक पातळ्यांवर चीनची पीछेहाट जोरात सुरू आहे. त्यामुळे जनसामान्यांच्या मनात उफाळणा-या असंतोषाचा विस्फोट होऊन त्याचा भडका उडण्याची भीती चिनी शासनकर्त्यांना वाटते आहे. अशा काळात मूळ प्रश्नांपासून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवणे हा सोयीस्कर मार्ग चीनने आताशा अवलंबिलेला असण्याची दाट शक्यता आहे. राष्ट्रवादाचे आवाहन बळकट करत तसे वातावरण उभे करून नागरिकांचे लक्ष वेगळ्या मुद्यांकडे वेधण्याचे चीनचे सध्याचे धोरण दिसून येते आहे. भारतीय सीमांवर घुसखोरीच्या कुरापती करण्यामागे हेही एक कारण असण्याची दाट शक्यता आहे.

चीन आणि भारत यांच्यामध्ये सुरू असलेल्या कुरबुरींमधून उद्या खरोखर युद्धाचा भडका उडू शकेल का किंवा चीन तसे धाडसी पाऊल उचलेल का, या प्रश्नाचे थेट उत्तर देणे अवघड आहे. तरीही आजच्या घडीला चीनमधील अंतर्गत परिस्थिती, ढासळणारी आर्थिक स्थिती आणि जनतेत वाढणारा असंतोष लक्षात घेता युद्धासारखा आततायी निर्णय चीन घेणार नाही असे वाटते. कारण सध्याच्या परिस्थितीत युद्ध करणे चीनला परवडणार नाही. तरीही, दुर्दैवाने जर चीन आणि भारत यांच्या दरम्यान युद्ध छेडले गेलेच तर, १९६२ सालचा भारत आता राहिलेला नाही, हे चीनला लक्षात घ्यावेच लागेल. आजचे वास्तव असे आहे की, शस्त्रसज्जता, सतर्कता आणि आक्रमकता अशा सर्वच पातळ्यांवर भारत सक्षम असल्याने चीनचे मोठ्या प्रमाणावर नुकसान घडवण्याचे सामर्थ्य भारताकडे आहे.

युद्ध करण्याचे पाऊल चीनने उचललेच तर तोडीसतोड प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय लष्कर पूर्णपणे सुसज्ज आहे. चीनमधील अनेक महत्त्वाची ठिकाणे, रस्ते, पूल आजमितीस भारतीय क्षेपणास्त्रांच्या टप्प्यात आहेत हे चीनदेखील पुरता जाणून आहे. अर्थात, अशा संभाव्य सशस्त्र संघर्षात भारताचेही नुकसान होईलच. परंतु, युद्धखोर आव्हानाची फार मोठी किंमत चीनला चुकवावी लागेल हे मात्र नक्की.

आजघडीला सर्वच पातळ्यांवर भारतीय लष्कर सक्षम, समर्थ आणि सुसज्ज आहे. शत्रूला जेरीस आणू शकणारी 'सुखोई', 'राफेल'सारखी लढाऊ विमाने भारताच्या ताफ्यात आहेत. या शिवाय, सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सियाचीन भारताकडे आहे आणि तिथे भारताने सक्षम स्थान प्राप्त केलेले आहे. सियाचीन उंचीवर असल्याने सामरिकदृष्ट्या भारताला त्याचा निश्चितपणे फायदा होणार आहे. भारतीय जवानांचे मनोधैर्यदेखील उंचावलेले आहे. इतकेच नव्हे तर, मनोबलाच्या पातळीवरही चिनी सैन्यापेक्षा भारतीय सैन्यदल अधिक वरचढ ठरू शकेल अशी परिस्थिती आहे. प्रसंगोत्पात देशात उद्‌भवणारी अशांतता आणि सीमावर्ती प्रांतात प्रदीर्घ काळ नांदणारे अस्थैर्य यांपायी भारतीय सैन्याला युद्ध किंवा युद्धजन्य परिस्थिती या दोहोंचा सामना करण्याचा सातत्यपूर्ण सराव आहे. परंतु, चिनी सैन्याची परिस्थिती तशी नाही. त्यामुळे कदाचित चिनी सैन्य हे भारतीय सैन्याला वचकून असण्याची शक्यता अधिक आहे.

थेट आव्हान देऊन युद्धाच्या मैदानात उतरण्यापेक्षा अचानक चढाई करून शत्रूच्या मनात भीती बसवण्याची चिनी राज्यकर्त्यांची पारंपरिक मानसिकता आजही बदललेली नाही. ती लक्षात घेऊन भारताला आपल्या सीमांच्या रक्षणासाठी सदैव सतर्क राहावे लागणार आहे. घोषित आणि सर्वंकष अशा प्रत्यक्ष युद्धाच्या शक्यता फार कमी असल्या तरी कारणपरत्वे चीनच्या कुरापती मात्र या ना त्या स्वरूपात सुरूच राहतील, असा अंदाज आंतरराष्ट्रीय पातळीवर वर्तवला जातो आहे. त्यामुळेच, भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावरची मुत्सद्देगिरी या सगळ्यांत अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. कुठल्याच प्रकारे आणि कोणत्याही पातळीवर बेसावध राहणे भारताला अजिबातच परवडणारे नाही. ■■




## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक अ‍ॅन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### अर्थबोधपत्रिका मासिक : वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

# ग्रंथालयातील नवीन पुस्तके

## POLITICAL SCIENCE

**VOLUME 1 : THE INDIAN STATE**

**ICSSR Research Surveys and Explorations,**
**Edited by : Samir Kumar Das, General Editor - Achin Vanaik, Oxford University Press, New Delhi, India, pp. XXXIX+175, first edition published in 2013.**

विकासाच्या प्रक्रियेमध्ये 'शासनसंस्था' आणि 'बाजारपेठ' या दोन भागीदारांचे योगदान असते, ही वस्तुस्थिती आता ब-यापैकी प्रस्थापित आणि सर्वमान्य झालेली आहे. भारतही त्याला अपवाद नाही. विशेषतः १९९०-९१ सालानंतर आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाने ज्या गतीने आणि पद्धतीने भारतीय वास्तवात आगेकूच केली त्यांमुळे भारतीय शासनसंस्थेची भूमिका, व्यक्तिमत्व आणि कार्यपद्धती यां संदर्भात नव्याने आकलन करून घेण्याची निकड अभ्यासकांना प्रकर्षाने जाणवू लागली. समाजजीवनाच्या आरोग्य, शिक्षण, रोजगार यांसारख्या अंगांसंदर्भातील धोरणनिश्चिती व धोरणांची अंमलबजावणी, सार्वजनिक उपयोगाच्या वस्तू व सेवांची निर्मिती आणि पुरवठा यांसारख्या क्षेत्रांमधून, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा एक आनुषंगिक परिणाम म्हणून शासनसंस्था दुय्यम भूमिका स्वीकारते आहे का, असा प्रश्न या संदर्भात उपस्थित होऊलागला. आर्थिक पुनर्रचनेचे वारे जागतिक अर्थकारणात सर्वत्रच कमी-अधिक प्रमाणात वाहत असल्याने, शासनसंस्थेची अन्य देशांमधील कार्यप्रणाली आणि भारतीय शासनसंस्थेचे कार्यकलाप यांत काय व कितपत साधर्म्य नांदते अथवा कसे, हा दुसरा प्रश्न मग कुतूहलाचा बनतो. अशा या स्थित्यंतरादरम्यान शासनसंस्थेच्या लोकशाही रंगरूपामध्ये गुणात्मक असे काही बदल दिसतात अथवा जाणवतात का, असा तिसरा प्रश्नही अधिकच संवेदनशील व कळीचा शाबीत होतो. या तीनही अंगांनी भारतीय व्यवस्थेतील शासनसंस्थेच्या कार्यप्रणालीची चिकित्सा करणा-या संशोधकीय साहित्याचे संकलन असणारा प्रस्तुत ग्रंथ कसलेल्या अभ्यासकांप्रमाणेच जिज्ञासू वाचकांनाही खचितच वेधक व अभ्यसनीय वाटावा. ■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Published and Posted at Model Colony Post Office Pune,
on 10th of each month

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**